**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१-आनंदीबाई आत्माराम घरत</u>**

**<u>यांचा शपथेवर उलटतपास सुरु</u>**

**<u>वादी यांचेतर्फे वकील श्री. एम.एम. मोकल यांच्यामार्फत</u>**

(१५) हे म्हणणे खरे नाही की, बाळया माया पाटील हे आमच्या कुटुंबाचे मुळ पुरुष होते. हे मला माहित नाही की, माझे आजोबा बाळया माया पाटील हे सन १९३१ साली मयत झाले. हे मला माहिती नाही की, माझे आजोबा बाळया माया पाटील यांना एकच मुलगा श्रावण बाळया पाटील हा होता. बाळया माया पाटील यांच्या वारसांची नोंद फेरफार नोंद ३९३ ने झाली आहे. हे मला माहित नाही की, बाळया माया पाटील यांच्या सर्व जमीनी वारसाहक्काने श्रावण बाळया पाटील यांच्या नावावरती आल्या. हे मला माहित नाही की, दावा कलममध्ये नमूद केलेल्या मिळकतीपैकी अनुक्रमांक १ ते ६ एवढयाच मिळकती वारसहक्काने श्रावणच्या नावावरती आलेल्या होत्या. हे मला माहित नाही की, दावा मिळकतीपैकी अनुक्रमांक ७, सर्व्हे नं.२४, हिस्सा नं.६ ही जमीन प्रतिवादी क्र.७ यांचे वडील बाळाराम यांना मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, बाळाराम याचे लग्न पदूबाई रामा ठाकूर यांच्यासोबत झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, बाळाराम यांचे लग्न पदूबाई यांच्यासोबत सन १९४६ मध्ये झाले. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीपैकी अनुक्रमांक ८ वरील सर्व्हे नं.५५, हिस्सा नं.५ ही मिळकत पदुबाईचे वडील रामा ठाकूर यांना संरक्षित कुळ म्हणून देशमुख यांच्याकडून मिळाली होती. हे मला माहित नाही की, सर्व्हे नं.५५, हिस्सा नं.५ ही जमीन

पदुबाईच्या वडीलांनी तिला लग्नामध्ये कन्यादान म्हणून दिलेली जमीन आहे. हे मला सांगता येणार नाही की, सर्व्हे नं.५५, हिस्सा नं.८ ही जमीन सन १९४६ पासून पदुबाई व बाळाराम यांच्या ताब्यामध्ये आहे. हे मला माहित नाही की, १९६० साली आकारफोडपत्रकाच्या वेळेस सदर जमीन बाळारामचे नावावर आली व बाळाराम मयत झाल्यानंतर त्या जमीनीवर त्यांच्या वारसांची नोंद झाली. हे म्हणणे खरे आहे की, हया ज्या नोंदी झाल्या त्या मी आव्हानित केलेल्या नाहीत. हे मला माहित नाही की, सर्व्हे नं.५५, हिस्सा नं.५ या जमीनीचा ॲवार्ड अनंत, गणेश व वसंत यांच्या नावावर झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळेस हा ॲवार्ड झाला त्यावेळेस मी हरकत घेतलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्र.५५/५ हे माझे वडीलांच्या नावावर होते, याबाबत माझेकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही.

वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन उर्वरीत उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

| | |
|---|---|
| माझेसमक्ष | श्रवणोत्तर स्विकृत |
| सही/- | सही/- |
| ( एन.एस. काकडे )<br>३रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पनवेल<br>दिनांक ०४/०७/२०२४ | ( एन.एस. काकडे )<br>३रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पनवेल<br>दिनांक ०४/०७/२०२४ |